# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


जा.क्र.शिउसं/उमाशि-२/अप्रवेश्रेणी/पुवि/२०१६/ १८०११/१६

दिनांक :- 10 MAR 2016

प्रति,

**प्राचार्य,**
**महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,**
**उरुळी कांचन ता. हवेली जि. पुणे**

**विषयः-** अनाधिकृत जाहिरात प्रसिध्द केल्याबाबत

**संदर्भ : आपली दि २३.०२.२०१६ रोजीची दै. सकाळ वर्तमानपत्रा मधील शिक्षक नियुक्तीची जाहिरात**

दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात दिनांक २३.०२.२०१६ रोजी अनुदानित व विना अनुदानित शिक्षक भरती बाबत आपण जाहिरात प्रसिध्द् केलेली आहे शासन निर्णय दि. ०२ मे २०१२ मधील तरतुदीनुसार आणि शासन निर्णय दि. २०.६.२०१४ मधील तरतुदीनुसार नवीन शिक्षक भरती प्रक्रियेसाठी मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती गठित करण्यात आलेली आहे, सदर समितीचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्या खेरीज कोणत्याही प्रकारचे शिक्षक भरतीची दिलेली जाहिरात ही अनाधिकृत समजण्यात येईल.

आपण दिलेल्या जाहिरातीबाबत मा. विभागीय आयुक्त , पुणे विभाग यांच्या समितीकडुन जाहिरात देणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले दिसुन येत नाही. त्याचप्रमाणे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत या कार्यालयाकडे कोणताही पत्र व्यवहार केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे दि. २३.०२.२०१६ च्या जाहिरातीनुसार घेण्यात येणा-या उमेदवारांच्या मुलाखती या तात्काळ रद्द कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या खुलाशासह व्यक्तिशः या कार्यालयास सादर करावा.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी**

१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१
२) मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे